# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## प रि प त्र क  क्र. २२८/२०१८

संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांमधील शिक्षकी पदांवर (प्राचार्य व संचालकसहित) नेमणुका झाल्यानंतर कायमस्वरूपी निवड समितीमार्फत सदर नेमणुकांना विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे हे आपणास विदितच आहे. सदर मान्यता घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यापूर्वी शिक्षकी पदावर नेमणुकीची शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील संबंधित महाविद्यालयाच्या लॉगिन आयडी. वरून टिचर प्रोफाईल भरणे अनिवार्य आहे. सदर टिचर प्रोफाईल भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव त्यांची नेमणूक झाल्यानंतर एक महिन्याच्या आत विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे हे आपणास यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

कायमस्वरूपी नेमणूक झाल्यानंतर जर एखाद्या शिक्षकास (प्राचार्य/संचालकसहित) संबंधित संलग्नित महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील सेवा सोडून द्यावयाचे असल्यास त्याबाबतच्या प्रक्रियेचा उल्लेख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अध्यापकांसंदर्भातील परिनियम ४२९ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे :

**Statute 429 : Seeking Release:**

(1) (a) The teacher shall not leave the service of the University/College/ Recognized Institution without giving to the University/Governing Body three months notice, if he is confirmed, or one month's notice if he is on probation or in lieu thereof pay to the University/Governing Body an amount equivalent to three months' or one month's salary, as the case may be.

(b)The Principal appointed in a College conducted by or affiliated to the University or Head of the Recognized Institution shall not leave the service without giving three months' notice if on probation or six months' notice if confirmed to the University/Management or in lieu of notice pay to the University/Governing Body an amount equivalent to three months' or six months' salary as the case may be.

(c)Where a teacher is appointed on a specific contract, the period and conditions of contract shall not be inconsistent with the conditions as laid down herein.

(d) The University/Governing Body, at its discretion may waive the above notice period in part or in full.

उपरोक्त परिनियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्वसूचना देण्याचा कालावधी संपल्यानंतर संबंधित संस्थाचालकांनी १५ दिवसांचे आत अध्यापकांना सेवेतून मुक्त केल्याचे प्रमाणपत्र द्यावे. काही महाविद्यालयांमध्ये अध्यापकांनी पूर्वसूचना देऊनही त्यांना संबंधित महाविद्यालयातून सेवा मुक्ततेचे प्रमाणपत्र (Relieving Certificate) दिले जात नाही व अशा अध्यापकांची नावे त्याच महाविद्यालयातील

टिचर प्रोफाईलमध्ये आढळून येतात. पर्यायाने अशा अध्यापकांना दुस-या महाविद्यालयामध्ये रूजू होता येत नाही व याबाबत विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त होतात.

त्यास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, ज्या कायमस्वरूपी अध्यापकांचा पूर्वसूचनेचा कालावधी संपल्यानंतर १५ दिवसांचे आत त्यांचा राजीनामा स्वीकारून त्यांना सेवा मुक्ततेचे प्रमाणपत्र न दिल्यास व अशा अध्यापकांच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्यास याबाबत संबंधित संस्थेकडून खुलासा मागविण्यात येईल व १५ दिवसांचे आत खुलासा प्राप्त न झाल्यास अथवा खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधित अध्यापकाचे महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या टिचर प्रोफाईलमध्ये असलेले नाव विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून वगळण्यात येईल.

ज्या शिक्षकांची मान्यता एका शैक्षणिक वर्षापुरती आहे अशा शिक्षकांची नावे संबंधित महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी टिचर प्रोफाईलमधून शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर वगळावीत. जर नावे वगळली नाहीत तर शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्या वर्षाच्या दि. १ जून रोजी अशा शिक्षकांची नावे टिचर प्रोफाईलमधून विद्यापीठाकडून वगळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७ )
जावक क्र. : CCO/2872/२०१८ )
दिनांक : 14 डिसेंबर, २०१८ )

१४/१२/१८
उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

प्रति,
प्राचार्य / संचालक / अध्यक्ष
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक.